# जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
## सामान्य प्रशासन विभाग
## जाहिर प्रकटन

I. जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती-2023 अन्वये जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अंतर्गत घेणेत आलेल्या ऑनलाईन परीक्षेअंती गुणवत्ता यादी व गुणवत्ता यादीनुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून कागदपत्र पडताळणी अंती (१)**आरोग्य पर्यवेक्षक**, (२)**कनिष्ठ लेखाधिकारी** ,(३) **विस्तार अधिकारी (कृषी)**, (४) **तारतंत्री (वायरमन)** , (५) **कनिष्ठ अभियंता (विदयुत)**, (६) **वरिष्ठ सहाय्यक**, (७) **पर्यवेक्षीका (मुख्य सेविका)**, (८) **वरिष्ठ सहाय्यक (लेखा)** या **आठ** संवर्गातील घोषित केलेल्या रिक्त पदांकरीता अंतिम निवड व प्रतिक्षा यादी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या **https://www.zpsindhudurg.maharashtra.gov.in/** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

II. जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती-2023 अन्वये जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अंतर्गत घेणेत आलेल्या ऑनलाईन परीक्षेअंती गुणवत्ता यादी व गुणवत्ता यादीनुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून कागदपत्र पडताळणी अंती (१) **पशुधन पर्यवेक्षक**, (२) **कनिष्ठ सहाय्यक (लेखा)** या **दोन** संवर्गातील घोषित केलेल्या रिक्त पदांकरीता अंतिम निवड व काही प्रवर्गाकरीता प्रतिक्षा यादी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या **https://www.zpsindhudurg.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. तसेच काही प्रवर्गाकरीता प्रतिक्षा यादीसाठी पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने गुणानुक्रमे पुढील उमेदवारांना कागदपत्र पडताळणी साठी बोलावीण्याची यादी प्रसिदध करण्यात आली आहे.

III. जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती-2023 अन्वये जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अंतर्गत घेणेत आलेल्या ऑनलाईन परीक्षेअंती गुणवत्ता यादी व गुणवत्ता यादीनुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून कागदपत्र पडताळणी अंती (१) **औषध निर्माण अधिकारी** (२) **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम / ग्रामिण पाणी पूरवठा), (३) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम / लघु पाटबंधारे )** या **तीन** संवर्गातील घोषित केलेल्या रिक्त पदांकरीता अंतिम निवड व प्रतिक्षा यादीसाठी पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने गुणानुक्रमे पुढील उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी बोलावीण्याची यादी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या **https://www.zpsindhudurg.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. (१) **पशुधन पर्यवेक्षक**, (२) **कनिष्ठ सहाय्यक (लेखा)**, (३) **औषध निर्माण अधिकारी** , (४) **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम / ग्रामिण पाणी पूरवठा )** (५) **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम / लघु पाटबंधारे )** या **पाच** संवर्गातील कागदपत्र पडताळणीसाठी यादीतील उमेदवारांनी मूळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व कागदपत्रा सह पडताळणी करीता दिनांक - **१६.०८.२०२४** रोजी सकाळी **१०-३०** वाजता जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथे उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

मूळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व मूळ कागदपत्र सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी सोबत जोडणेत आली आहे. त्यानुसार उमेदवारांनी नमूद मूळ आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज व त्यांची 2 स्वसाक्षांकित प्रतीसह वर नमुद केलेप्रमाणे "श्री. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह", जिल्हा परिषद सिंधुदुर्ग (पहिला मजला), सिंधुदुर्गनगरी येथे न चुकता उपस्थित रहावे. कागदपत्र पडताळणीकरीता बोलावणेत आलेल्या उमेदवारास अंतिम निवडीचा कोणताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच उक्त दिनांकास कागदपत्रे/ दस्तऐवज पडताळणी करीता गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना निवड प्रक्रिये संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची नोंद घ्यावी. कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

कागदपत्र पडताळणीअंती अंतिम निवड यादी मा.अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे मान्यतेनंतर सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करणेत येईल.

क्र.सिंजिप/साप्रवि/आस्था-१/892/२०२४
सामान्य प्रशासन विभाग,जि.प.सिंधुदुर्ग.
सिंधुदुर्गनगरी, **दिनांक** :- ०७.०८.२०२४

**(किशोर काळे)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)**
**तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग.**